साप्ताहिक
# लोकहिरा न्यूज
''लोक स्वातंत्र्य हेच लोकहिराचे मूळ''
■ संपादक : श्री. गणपती लक्ष्मण शिंदे (मो. ७२७६७५६५७७) ■ Email : saptahiklokhiranews51410@gmail.com
Volume-5/Issue: 17/ Date: Friday 12/06/2026 To Thursday 18/06/2026
Pages-No 2
RNI.NO.MAHMAR/2022/85385

# कोजिमाशि'च्या चेअरमनपदी राजेंद्र पाटील तर व्हा. चेअरमनपदी प्रकाश कोकाटे यांची बिनविरोध निवड



## 'स्वाभिमानी सहकार' आघाडीची सलग चौथ्यांदा सत्ता; पारदर्शक व सभासदहिताचा कारभार करण्याची नूतन पदाधिकाऱ्यांची ग्वाही

कोल्हापूर (लोकहिरा न्यूज वार्ताहर): कोल्हापूर जिल्हा माध्यमिक शिक्षण सेवकांची सहकारी पतसंस्था (कोजिमाशि)च्या चेअरमनपदी राजेंद्र मारुती पाटील (भाई माधवराव बागल विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, विक्रमनगर, कोल्हापूर) तर व्हा. चेअरमनपदी प्रकाश रामचंद्र कोकाटे (माध्यमिक विद्यालय, शिटूर तर्फ मलकापूर) यांची संचालक मंडळाच्या बैठकीत बिनविरोध निवड करण्यात आली.शाहूपुरी येथील संस्थेच्या मुख्य कार्यालयात झालेल्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी निवडणूक निर्णय अधिकारी चंद्रकांत इंगवले होते. शिक्षक नेते दादासाहेब लाड यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड प्रक्रिया पार पडली.

चेअरमन पदासाठी राजेंद्र पाटील यांचा तर व्हा. चेअरमनपदासाठी प्रकाश कोकाटे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी चंद्रकांत इंगवले यांनी दोघांची बिनविरोध निवड झाल्याचे घोषित केले. चेअरमनपदासाठी राजेंद्र पाटील यांचे नाव संचालक मनोहर पाटील यांनी सुचविले, तर अनिल चव्हाण यांनी अनुमोदन दिले. तसेच व्हा. चेअरमनपदासाठी प्रकाश कोकाटे यांचे नाव शीतल हिरेमठ यांनी सुचविले व श्रीकांत कदम यांनी अनुमोदन दिले.निवड प्रक्रियेचे वाचन मुख्य कार्यकारी अधिकारी जयवंत कुरडे यांनी केले. निवडीनंतर समर्थकांनी फटाक्यांची आतषबाजी व गुलाल उधळून आनंदोत्सव साजरा केला.यावेळी संचालक अविनाश चौगले, बाळ डेळेकर, डॉ. दत्तात्रय घुगरे, दीपक पाटील, सचिन शिंदे, राजाराम शिंदे, राजेंद्र रानमाळे, मदन निकम, उत्तम पाटील, शरद तावदारे, पांडुरंग हळदकर, श्रीकांत पाटील, सुभाष खामकर, जितेंद्र म्हैशाळे, ऋतुजा पाटील, पांडुरंग पाटील यांच्यासह उपमुख्य कार्यकारी अधिकारी उत्तम कवडे उपस्थित होते.

निवडीनंतर शिक्षक नेते दादासाहेब लाड यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना लाड म्हणाले, "सभासदांनी 'स्वाभिमानी सहकार' आघाडीवर विश्वास ठेवून सलग चौथ्यांदा एकहाती सत्ता दिली आहे. सभासदांचे हित डोळ्यासमोर ठेवून दिलेल्या वचननाम्यातील आश्वासनांची टप्प्याटप्प्याने पूर्तता केली जाईल."सत्काराला उत्तर देताना नूतन चेअरमन राजेंद्र पाटील व व्हा. चेअरमन प्रकाश कोकाटे यांनी, "दादासाहेब लाड यांनी आमच्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरवत सर्वांना विश्वासात घेऊन काटकसरीचा, पारदर्शक व आदर्शवत कारभार करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत," अशी ग्वाही दिली.





आम्ही पत्रकारिता करण्याची सुवर्णसंधी देत आहोत.
तसेच संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून एकाचवेळी आम्ही साप्ताहिक लोकहिरा न्यूज हा अंक प्रकाशित व वितरीत करण्यासाठी आम्ही उपसंपादक, वृत्त संपादक, जिल्हा प्रतिनिधी, तालुका प्रतिनिधी, जाहिरात प्रतिनिधी नेमणेचे ठरविले आहे. इच्छुकांनी अर्जासह संपर्क साधावा.
श्री. गणपती शिंदे
मो. ७२७६७५६५७७
(नियम व अटी लागू)

Scanned with OKEN Scanner

साप्ताहिक
# लोकहिरा न्यूज
''लोक स्वातंत्र्य हेच लोकहिराचे मूळ''
▪ संपादक : श्री. गणपती लक्ष्मण शिंदे (मो. ७२७६७५६५७७) ▪ Email : saptahiklokhiranews51410@gmail.com

Volume-5/Issue: 17/ Date: Friday 12/06/2026 Thursday 18/06/2026 | Pages-4 Prize-5 Rs RNI.NO.MAHMAR/2022/85385

लोकहिरा न्यूज वृत्त सेवा

## स्वच्छता कर्मचाऱ्यांची कमतरता; ग्रामपंचायत सदस्यच उतरले रस्त्यावर!



करवीर ता. प्रतिनिधी :
वसगडे ग्रामपंचायतीमध्ये स्वच्छता कर्मचाऱ्यांची कमतरता भासत असतानाही गाव स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी ग्रामपंचायत सदस्यांनी स्वतःच पुढाकार घेतला आहे. पोटनिवडणुकीत निवडून आलेले ग्रामपंचायत सदस्य सचिन कांबळे व विशाल कांबळे यांनी आपल्या प्रभागातील स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारत गटारींची साफसफाई, कचरा व्यवस्थापन आणि बाहेरून कामगार उपलब्ध करून परिसर स्वच्छ ठेवण्याचे अभियान सुरू केले आहे.
केवळ स्वच्छतेपुरतेच मर्यादित न राहता, जलजीवन मिशन योजनेअंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठ्यादरम्यान नागरिकांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी सदस्यांनी थेट घरभेटी दिल्या. पाणी कनेक्शनधारकांच्या तक्रारी ऐकून त्यांना आवश्यक सूचना व मार्गदर्शन करण्यात आले. पाणीपुरवठा सुरळीत व्हावा यासाठी नागरिकांशी संवाद साधून समस्या तातडीने सोडविण्याचा प्रयत्न करण्यात आला.
यावेळी ग्रामपंचायत सदस्या निशाताई कांबळे यांनीही सक्रिय सहभाग घेत नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच करवीर पंचायत समितीचे प्रतिनिधी आलाशे साहेब, ग्रामपंचायत कर्मचारी सुनील धनगर, वसंत पांढरबळे, प्रवीण जाधव तसेच पाणीपुरवठा कर्मचारी ठाकूर कांबळे उपस्थित होते.लोकप्रतिनिधी स्वतः रस्त्यावर उतरून स्वच्छता आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी काम करत असल्याने वसगडे ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त करण्यात येत असून या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे."पदापेक्षा सेवा महत्त्वाची!" – वसगडे ग्रामपंचायत सदस्यांचा आदर्श उपक्रम चर्चेत.




## शहापूर;- पोलिसांचा एनडीपीएस धडाका; 2.34 लाखांचा गांजा जप्त!"

### अमली पदार्थांच्या विळख्यातून युवकांना वाचवण्यासाठी पोलिसांचा कडक निर्धार; तस्करांवर कारवाईचा बडगा अधिक तीव्र होणार!

इचलकरंजी/हातकणंगले : (लोकहिरा न्यूज वृत्तसेवा) कोल्हापूर जिल्ह्यात अमली पदार्थविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेत शाहापूर पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. कोरोची परिसरात गांजा विक्रीसाठी आलेल्या तिघांना पोलिसांनी सिनेस्टाईल सापळा रचून अटक केली. या कारवाईत 2 किलो 289 ग्रॅम गांजा, एक मोपेड आणि तीन मोबाईल फोन असा एकूण 2 लाख 34 हजार 225 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार 10 जून रोजी दुपारी कोरोची (ता. हातकणंगले) येथील चव्हाणवाडी टेकडी परिसरात विशेष सापळा रचण्यात आला. संशयितांची झडती घेतली असता त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात गांजा आढळून आला. त्यानंतर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत तिघांनाही बेड्या ठोकल्या.अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये उत्तर प्रदेशमधील दोन तरुणांसह एका स्थानिक युवकाचा समावेश आहे. धक्कादायक बाब म्हणजे, अटक केलेल्या आरोपींपैकी एकावर यापूर्वीही गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्याची नोंद असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.ही धडक कारवाई कोल्हापूर जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली शाहापूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक व गुन्हे शोध पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. जिल्ह्यात सुरू असलेल्या एनडीपीएस मोहिमेमुळे अमली पदार्थ तस्करांचे धाबे दणाणले असून आगामी काळात अशा कारवाया आणखी तीव्र करण्यात येणार असल्याचे संकेत पोलिसांनी दिले आहेत.



## गांजा तस्करांवर पोलिसांचा सर्जिकल स्ट्राईक; कोरोचीत धडक कारवाई!

## पर्यावरण रक्षणात कचरावेचकांचे मोलाचे योगदान:

### विविध मागण्यासाठी महानगरपालिकेला निवेदन.




कोल्हापूर : (लोकहिरा न्यूज वृत्तसेवा) गेली १५ वर्षे कचरा वेचकांच्या अधिकारांसाठी कार्यरत असलेल्या अवनि संस्थेतर्फे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कचरा वेचकांच्या विविध मागण्यांचे निवेदन कोल्हापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त रविकांत अडसुळे यांना देण्यात आले. शहरातील कचरा वेचक दररोज ३०० किलोहून अधिक विक्रीयोग्य प्लास्टिक गोळा करून पर्यावरण संवर्धनास हातभार लावत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. कचरा वेचकांना ओळखपत्र देणे, NSKFDC च्या नमस्ते योजने अंतर्गत ड्राय वेस्ट संकलन युनिट उपलब्ध करून देणे, हँडग्लोज, मास्क व बूट वाटप करणे, कचरा वर्गीकरण व डोअर-टू-डोअर संकलनात त्यांचा समावेश करणे, नवीन नियमांबाबत महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आयोजित करणे तसेच नियमित आरोग्य तपासणी व धनुर्वात प्रतिबंधक लसीकरणाची सुविधा देण्याची मागणी करण्यात आली. यावेळी संगिता लोंढे, बनाबाई कांबळे, मंगल कांबळे, भारती गोसावी, सुनिता मलिक, दिलशा जमादार व अवनि संस्थेचे प्रकल्प समन्वयक जैनुद्दीन पन्हाळकर उपस्थित होते.

## वृद्धांच्या सुरक्षिततेसाठी व सन्मानाने जगण्यासाठी अशा संस्थांची नितांत गरज : गणपती शिंदे




सद्गुरु संत श्री बाळूमामा वृद्धाश्रमाचे शानदार उद्घाटन

करवीर (प्रतिनिधी) : समाजातील निराधार, गरजू व ज्येष्ठ नागरिकांना सुरक्षित निवारा, आधार आणि सन्मानाने जीवन जगण्याची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने स्वराज्य ग्राहक न्यायनिवाडा वेल्फेअर समिती, दिल्ली यांच्या पुढाकारातून उभारण्यात आलेल्या सद्गुरु संत श्री बाळूमामा वृद्धाश्रमाचे उद्घाटन चव्हाणवाडी (ता. करवीर, जि. कोल्हापूर) येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.
दिव्यांग प्रहार क्रांती चॅरिटेबल ट्रस्टचे संचालक नारायण हुपरीकर यांच्या हस्ते फीत कापून व श्रीफळ वाढवून वृद्धाश्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभली.प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले लोकहिरा न्यूजचे संपादक गणपती शिंदे यांनी आपल्या मनोगतात वृद्धांच्या सुरक्षिततेचा व सन्मानाचा मुद्दा अधोरेखित केला. ते म्हणाले, "वृद्धाश्रम हे केवळ निवाऱ्याचे ठिकाण नसून ज्येष्ठ नागरिकांना आधार, आत्मीयता आणि नवसंजीवनी देणारे केंद्र आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीत वृद्धांच्या सुरक्षिततेसाठी व सन्मानाने जगण्यासाठी अशा संस्थांची नितांत आवश्यकता आहे."उपस्थित मान्यवरांनी वृद्धाश्रमाच्या कार्याचे कौतुक करत ज्येष्ठ नागरिकांच्या सेवेसाठी अशा उपक्रमांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. तसेच समाजातील दानशूर व्यक्तींनी या सेवाभावी कार्यात योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन गणपती शिंदे यांनी केले. तर दिव्यांग प्रहार क्रांती चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष विकास गायकवाड यांनी उपस्थित मान्यवर, पाहुणे व नागरिकांचे आभार मानले.या प्रसंगी स्वराज्य ग्राहक न्यायनिवाडा वेल्फेअर समितीचे संस्थापक अध्यक्ष दत्ता मांजरे (तारदाळकर), राष्ट्रीय कार्याध्यक्ष दत्तात्रय गोडबोले, महाराष्ट्र राज्य कामगार अध्यक्ष दगडू कांबळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवर उपस्थित होते.सामाजिक बांधिलकी, ज्येष्ठांविषयीची संवेदनशीलता आणि सेवाभावाचा संदेश देणारा हा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात आशेचा नवा किरण निर्माण करणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

Scanned with OKEN Scanner